# बोधिसत्व सहकारी रुग्णालय म.पुणे

## प्रस्तावित उपविधी दुरुस्ती म.स.संस्था अधिनियम १९६० चे कलम १३ (१) आणि नियम १२ मधील तरतुदीन्वये

| अनु.क्रं. | मंजुर उपविधीतील नियम क्रं | उपविधीतील सद्याची शब्दरचना | दुरुस्त करावयाची शब्दरचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्दरचना | उपविधी दुरुस्तीचे कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | नियम क्रं.४ | **संस्थेचे कार्यक्षेत्र**<br>संपुर्ण पुणे जिल्हा भौगोलिक सिमेपुरता मर्यादीत राहील. | पुणे जिल्हा या शब्दानंतर सोलापूर जिल्हा हे शब्द समाविष्ट करणेत येत आहे | **संस्थेचे कार्यक्षेत्र**<br>संपुर्ण पुणे जिल्हा आणि सोलापुर जिल्हा या दोन जिल्हयाच्या भौगोलिक सिमेपुरता मर्यादीत राहील. | संस्थेचे रुग्णालय स्वबळावर उभारणेसाठी, निधी उपलब्धतेसाठी |
| २ | नियम क्रं.५ (२१) | संस्थेचे सभासद व कुटुंबातील सदस्यांना रुग्णालयाद्वारे वैद्यकिय सुविधा सवलतीच्या दराने पुरविणे तथापि अशा सवलतीच सुविधा संस्थेचे संचालक मंडळ सदस्य व कुटुंबातील सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही. | त्यांचे कुटूंबातील सदस्यांना या शब्दानंतर आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांना हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत. | संस्थेचे सभासद व त्यांचे कुटूंबातील सदस्यांना आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांना रुग्णालयाद्वारे वैद्यकिय सुविधा सवलतीच्या दराने पुरविणे तथापि म.स.सं.अधिनियम १९६० चे कलम ७३-कअ (१) (क) (पाच) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या कार्यक्षेत्रातील समान व्यवसाय करणाऱ्या वैद्यकिय व्यावसायकांना रुग्णालयीन सेवेचा लाभ घेता येणार नाही. | संस्थेच्या सभासद आणि कर्मचाऱ्यांचे हितावह आणि म.स.स.अधि. १९६० चे कलम ७३-कअ (१) (क) (पाच) मधील तरतुदीनुसार. |

| अनु.क्रं. | मंजुर उपविधीतील नियम क्रं | उपविधीतील सद्याची शब्दरचना | दुरुस्त करावयाची शब्दरचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्दरचना | उपविधी दुरुस्तीचे कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ३ | नियम क्रं.७ अ आणि नियम क्रं.७-ब | ७ अ) **<u>क्रियाशिल सभासद म्हणजे</u>**<br>ज्या सभासदाने मागील सलग ५ वर्षात किमान एक अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थिती आणि प्रत्येक वर्षी वार्षिक वर्गणी रु.२०००/- देणे अनिवार्य राहील. या व्यतिरिक्त प्रथम पाच वर्षात किमान रु,५०,०००/- बिनव्याजी ठेवी किंवा रु.२०,०००/- देणगी किंवा मागील सलग पाच वर्षात रुग्णालय सेवेचा लाभ घेतला असला पाहिजे.<br>७ ब) **<u>अक्रियाशील सभासद</u>**<br>जो सभासद वरील ७-अ मधील तरतुदींची पुर्तता करीत नसेल अशा सभासदांचे वर्गीकरण अक्रियाशील सभासद म्हणून कारण्यात येईल.<br>टिप :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ मधील तरतुदीचे पालन करणे अनिवार्य राहील. | खालील प्रमाणे शब्द वगळण्यात येत आहेत. १. क्रियाशील सभासद म्हणजे २. ज्या ३.मागील सलग ५ वर्षात किमान एक अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थिती आणि ४.किंवा मागील सलग ५ वर्षात रुग्णालय सेवेचा लाभ घेतला असला पाहिजे.५. अक्रियाशील सभासद ६.जो सभासद वरील ७ अ मधील तरतुदीची पुर्तता करीत नसेल अशा सभासदांचे वर्गिकरण अक्रियाशील सभासद म्हणून करण्यात येईल.<br>खालील प्रमाणे नियम ११ वगळून नियम ७ब मधे खालील प्रमाणे शब्द रचना समाविष्ट करण्यात येत आहे.<br>टिप. अशा रितीने जमा झालेल्या वर्गणीचे रक्कम प्रत्येक सभासदाच्या नावे १०० भागाच्या रचनेपर्यंत भागापोटी जमा केली जाईल व त्यापुढे जमा होणारी रक्कम संचित ठेव ( Cumulative deposit) ठेव म्हणून जमा राहील. अशा प्रकारे संचित ठेवीवर व्याज अनुज्ञेय नाही. | ७ अ) प्रत्येक वर्षी (वार्षिक) वर्गणी सभासदाने रु.२०००/- (दोन हजार अक्षरी) देणे अनिवार्य राहील. या व्यतिरिक्त प्रथम पाच वर्षात किमान रु.५०,०००/-(पन्नास हजार) बिनव्याजी ठेवी किंवा किमान रु.२०,०००/- (अक्षरी विस हजार) देणगी दिली पाहिजे.<br><br>७ ब) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ मधील तरतुदीचे पालन करणे अनिवार्य राहील.<br><br>टिप. अशा रितीने जमा झालेल्या वर्गणीचे रक्कम प्रत्येक सभासदाच्या नावे १०० भागाच्या रचनेपर्यंत भागापोटी जमा केली जाईल व त्यापुढे जमा होणारी रक्कम संचित ठेव ( Cumulative deposit) ठेव म्हणून जमा राहील. अशा प्रकारे संचित ठेवीवर व्याज अनुज्ञेय नाही. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ मधील क्रियाशिल व अक्रियाशिल सभासद ही शब्दरचना अधिनयम दुरुस्ती क्रं.महा.२८/२०२२ दि.२२/३/२०२२ नुसार वगळण्यात आल्यामुळे. |

| अनु.क्रं. | मंजुर उपविधीतील नियम क्रं | उपविधीतील सद्याची शब्दरचना | दुरुस्त करावयाची शब्दरचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्दरचना | उपविधी दुरुस्तीचे कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ४ | नियम क्रं.१२ | सभासदाने घेतलेल्या भागाचा त्यास संस्थेने भाग दाखला दिला पाहीजे. | दिला पाहिजे या शब्दानंतर सभासदांनी भाग प्रमाणपत्र संस्थेच्या कार्यालयातून प्राप्त करणे. | सभासदाने घेतलेल्या भागाचा त्यास संस्थेने भाग दाखला दिला पाहीजे. सभासदांनी भाग प्रमाणपत्र संस्थेच्या कार्यालयातून प्राप्त करणे. | अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस जास्तीत जास्त सभासदांनी सहभाग घेणे करीता. |
| ५ | नियम क्रं.२५ | अधिमंडळाची वार्षिक बैठकीची १४ दिवसाची व विशेष बैठकीची ७ दिवसाची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका सभेपूर्वी काढून संस्थेच्या अध्यक्षाने ती सभा बोलविली जाईल अशा संभेची सूचना निबंधकांना दिली जाईल. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द केली जाईल. नोटीसीत सभेची तारीख व निश्चित वेळ नमूद केली पाहिजे. संस्थेच्या अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष हे नोटीसीवर सहया करतील. | नोटीसीवरसहया करतील या शब्दांनंतर परिस्थितीनुसार ऑनलाईन बैठक लिंकद्वारे घेता येईल. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका सदर संस्थेच्या वेबसाईटवर व्हॅटसअप ग्रुपवर प्रसिध्द करण्यात येईल व ती रितसर प्रसिध्द झाली असे ग्राहय धरण्यात येईल. सदर सभांची नोटीस संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन प्रसारित करण्यात येईल. | अधिमंडळाची वार्षिक बैठकीची १४ दिवसाची व विशेष बैठकीची ७ दिवसाची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका सभेपूर्वी काढून संस्थेच्या अध्यक्षाने ती सभा बोलविली जाईल अशा संभेची सूचना निबंधकांना दिली जाईल. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द केली जाईल. नोटीसीत सभेची तारीख व निश्चित वेळ नमूद केली पाहिजे. संस्थेच्या अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष हे नोटीसीवर सहया करतील. परिस्थितीनुसार ऑनलाईन बैठक लिंकद्वारे घेता येईल. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका सदर संस्थेच्या वेबसाईटवर व्हॅटसअप ग्रुपवर प्रसिध्द करण्यात येईल व ती रितसर प्रसिध्द झाली असे ग्राहय धरण्यात येईल. सदर सभांची नोटीस संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन प्रसारित करण्यात येईल. | अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस जास्तीत जास्त सभासदांचा सहभाग नोंदविणे करिता. |

| अनु.क्रं. | मंजुर उपविधीतील नियम क्रं | उपविधीतील सद्याची शब्दरचना | दुरुस्त करावयाची शब्दरचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्दरचना | उपविधी दुरुस्तीचे कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ६ | नियम क्रं. ३० (अ) | संस्थेच्या संचालकमंडळा मार्फत संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात निवडून येणारे एकूण १५ संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे ५ वर्ष इतका राहील तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी संस्थेच्या संचालकमंडळाच्या कालावधी ईतका राहील. निवडून आलेल्या संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील.<br>१. अनुसुचित जाती सभासद प्रतिनीधी - ११<br>२. ईतर मागासवर्गीय सभासद प्रतिनिधी-१<br>३. महिला सभासद प्रतिनिधी - ०२<br>४. वि.जा.भ.ज./विमाप्र सभासद -०१<br>एकूण........................- १५<br>वरील १५ प्रतिनिधीपैकी ५ प्रतिनीधी वैद्यकीय व्यवसायीक असणे अनिवार्य राहील. वरिल संचालकपदे संस्थेच्या सभासदामधून निवडनुकीद्वारे भरली जातील व सदर निवडणूक ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येईल. | संचालक मंडळाची रचना नव्याने प्रस्तावित करण्यात येत आहे | संस्थेच्या संचालकमंडळा मार्फत संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात निवडून येणारे एकूण ११ संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे ५ वर्ष इतका राहील तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी संस्थेच्या संचालकमंडळाच्या कालावधी ईतका राहील. निवडून आलेल्या संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील.<br>१. अनुसुचित जाती व नवबौध्द सभासद प्रतिनीधी -०६<br>२. अनुसुचित जमाती सभासद प्रतिनिधी-०१<br>३. ईती मागासवर्गीय सभासद प्रतिनिधी-०१<br>४. वि.जा./भ.ज./विमाप/सभासद प्रतिनिधी-०१<br>५. महिला सभासद प्रतिनिधी -०२<br>एकूण........................ ११ (अकरा)<br>वरील एकूण ११ (अकरा) प्रतिनीधीपैकी ०४ (चार) प्रतिनिधी वैद्यकीय व्यवसायिक असणे अनिवार्य राहील. वरील संचालक पद संस्थेच्या सभासदांमधून निवडणुकीद्वारे भरली जातील व सदर निवडणूक ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल. समितीची आणि तिच्या सदस्यांची संचालकपदी निवडणूक घेण्यास निरर्हता पुढील नियमाप्रमाणे लागू राहील.<br>१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधीनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ आणि संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार अपात्रता धारण करणारा.<br>२. कलम ७३ क अ (१) आणि नियम ५८ मधील तरतुदीनुसार अपात्रता धारण करणारा.<br>३. संचालक मंडळाच्या सलग तीन सभेस गैरहजर असल्यास.<br>४. कलम २६ मधील तरतुदीनुसार अपात्रता धारण करणारा. | संस्थेचा आर्थिक हितास्तव व अनुसुचित जमातीला प्रतिनीधीत्व मिळणेस्तव. |

| अनु.क्रं. | मंजुर उपविधीतील नियम क्रं | उपविधीतील सद्याची शब्दरचना | दुरुस्त करावयाची शब्दरचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्दरचना | उपविधी दुरुस्तीचे कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ७ | नियम क्रं.३४ | संचालक मंडळाची गणपूर्ती होण्यास पोटनियम क्रं.३० (अ) मध्ये नमूद संचालक सदस्यांपैकी ८ सभासद उपस्थित असल्यास गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. ३० (ब) मधील संचालक गणपूर्तीसाठी गणले जाणार नाही. | ८ ऐवजी ६ संचालक | संचालक मंडळाच्या सभेची गणपूर्ती (कोरम) होण्यास पोटनियम क्रं.३० (अ) मध्ये नमुद संचालक सदस्यांपैकी ०६ (सहा) सभासद सभेस उपस्थित असल्यास गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. पोटनियम क्रं.३० (ब) मधील संचालक, गणपूर्ती साठी गणले जाणार नाहीत. | उपविधी नियम क्रं.३०-अ मध्ये दुरुस्ती सुचविली मुळे. |
| ८ | नियम क्रं.४७ | १. संस्थेने दिलेले ओळखपत्र प्रत्येक सभासदाने स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे.<br>२. कलम २६ व उपविधीतील तरतुद क्रमांक ७-अ चे पालन करणे व क्रियाशिल सभासद राहणे.<br>३. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थित राहणे.<br>४. प्रती वर्षी वार्षिक वर्गणी ३० सप्टेंबर पूर्वी अदा करणे.<br>५. संचालक मंडळ निवडणुकीस मतदान करणे फक्त क्रियाशिल सभासदांनीच निवडणुकीत व अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस मतदान करण्याचा अधिकार राहील. | अनुक्रमांक २ मधील क्रियाशील सभासद राहणे हे शब्द वगळण्यात येत आहे. अनुक्रमांक ५ मधील फक्त क्रियाशील हे शबद वगळण्यात येत आहे व पात्र हा शब्द समाविष्ट करण्यात येत आहे. | १. संस्थेने दिलेले ओळखपत्र प्रत्येक सभासदाने स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे.<br>२. कलम २६ मधील तरतूद व उपविधीतील तरतुद क्रं.७अ चे पालन करणे अनिवार्य राहील.<br>३. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थित राहणे.<br>४. प्रतिवर्षी वार्षीक वर्गणी ३० सप्टेंबर पूर्वी अदा करणे.<br>५. संचालक निवडणुकीस मतदान करणे पात्र सभासदांना निवडणुकीत व अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत मतदान करण्याचा अधिकार राहील. | क्रियाशील सभासद ही तरतूद अधिनियमातील तरतूदीमधून वगळण्यात आल्याने |

| अनु.क्रं. | मंजुर उपविधीतील नियम क्रं | उपविधीतील सद्याची शब्दरचना | दुरुस्त करावयाची शब्दरचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्दरचना | उपविधी दुरुस्तीचे कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ९ | नियम क्रं. ४९ (६) | सभासदास नोटीस दिली पाहिजे असे या उपविधीत जेथे नमुद असेल तेथे सभासदांच्या दिलेल्या पत्यावर अशी नोटीस दिली म्हणजे त्या नोटीसीची योग्य अंमलबजावणी झाली असे समजले जाईल. | असे समजले जाईल या शब्दानंतर तसेच मोबाईल व्हॅस्टअपद्वारे दिलेली नोटीस हि योग्य नोटीस असल्याचे समजण्यात येईल. हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत. | सभासदास नोटीस दिली पाहिजे असे या उपविधीत जेथे नमुद असेल तेथे सभासदांच्या दिलेल्या पत्यावर अशी नोटीस दिली म्हणजे त्या नोटीसीची योग्य अंमलबजावणी झाली असे समजले जाईल.<br>असे समजले जाईल या शब्दानंतर तसेच मोबाईल व्हॅस्टअपद्वारे दिलेली नोटीस हि योग्य नोटीस असल्याचे समजण्यात येईल. हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत. | व्हॅस्टअपद्वारे दिलेली नोटीस ग्राहय धरण्यासाठी |